# महाराष्ट्रातील मृदा

**मृदेचे प्रकार**
- काळी / रेगुर / कापसाची काळी मृदा
- जांभी / लॅटेराईट मृदा
- गाळाची मृदा
- तांबडी व पिवळसर मृदा

## मृदेची व्याख्या :-

- "जनन खडकातील निरंतर प्रक्रियांच्या विकासाच्या किंवा उत्क्रांतीच्या परिपाकास मृदा म्हणतात."

## (1) रेगुर / काळी / कापसाची मृदा :-

- निर्मिती - बेसॉल्ट खडकाच्या निर्मितीपासून
- काळ्या मृदेत पाणी / ओलावा धरण्याची क्षमता जास्त असते. कारण चुनखडकांचे प्रमाण जास्त असते.
- ओलावा टिकवून ठेवल्यामुळे कापसाची लागवड मोठ्या प्रमाणात होते म्हणून यास कापसाची मृदा म्हणतात.
- तापी नदी खोऱ्यात सर्वात जास्त जाडी - 6 m पर्यंत
- काळा रंग = टिटॅनीफेरस मॅग्नेटाईट मुळे प्राप्त.
- या मृदेत - नायट्रोजन, फॉस्फरस व सेंद्रीय द्रव्याचे प्रमाण कमी.
- महाराष्ट्राच्या - 75 % भागात रेगुर मृदा
- दख्खनच्या पठारने MH चा 86.7 % भाग व्यापला. यावर रेगुर मृदा सर्वत्र.
- कोकण व पुर्व विभाग वगळून सर्वत्र.

## ② तांबडी मृदा :-

- निर्मिती - स्फटीकमय खडकापासुन
- लोहाचे प्रमाण अधिक - तांबडा रंग प्राप्त
- पाण्यात निचरा अधिक
- ह्युमसचे प्रमाण कमी
- महाराष्ट्रात आढळ → नागपुर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली
- सागांची वने मोठ्या प्रमाणात.
- या मृदेत - पालाश, स्फुरद, कॅल्शियम, चे प्रमाण कमी.

## ③ गाळाची मृदा :-

- या मृदेने भारतातील सर्वाधिक प्रदेश → 45.6 %

▶ **गुणधर्म :-**

- सेंद्रीय पदार्थांचे प्रमाण जास्त
- पालाश, चुनखडीचे प्रमाण जास्त
- फॉस्फरिक ॲसिडचे प्रमाण जास्त
- आढळ - तापी, गोदावरी, कृष्णा नदीखोरे
- रंग - हल्का तपकिरी ते राखाडी
- पिके - ऊस, भात, गहु

▶ **गाळाच्या मृदेचे कालावधीनुसार व स्वरूपानुसार प्रकार :-**

① भांगर
② खादर
③ भाबर
④ तराई

④ जांभी मृदा / लॅटेराइट मृदा :-

- निर्मिती - उष्ण व जास्त पावसाच्या प्रदेशात
- चुना व सिलीकाचे प्रमाण कमी लोह व ॲल्युमिनियमचे प्रमाण जास्त.
- आढळ → संपुर्ण कोकण + कोल्हापुर, गडचिरोली जिल्ह्याचा पुर्व भाग.
- सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात फळांची लागवड करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग.
- खारट व क्षारीय मृदेस चोपन मृदा म्हणुन ओळखले जाते.

## मृदा धुप

व्याख्या :-

"मृदेचे सर्वात वरचे सुपिक आवरण नष्ट होण्यास मृदा धुप म्हणतात."

- सर्वात महत्त्वाचे घटक - वारा व पाणी

▶ मृदा धुपीचे प्रमाण सर्वाधिक राज्य आढळ

① राजस्थान

② मध्यप्रदेश

③ महाराष्ट्र

▶ वाहत्या पाण्यामुळे होणाऱ्या धुपीचा क्रम -

① झोड / शिंतोडे धुप

② चादर धुप

③ नळी धुप

④ पळी धुप

⑤ नदीकाठची धुप